वर्ष-०७ अंक-५२ मुंबई, मंगळवार १६ ते २२ नोव्हेंबर २०२१ पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
नागपूर रेल्वेच्या दोन अधिकाऱ्यांविरुद्ध छेडखानीचा गुन्हा, महिला कर्मचाऱ्यानी केली होती तक्रार

3 → मुंबई क्रूझ ड्रग्स प्रकरण: सुनील पाटील, के पी गोसावीचाच सर्व प्लॅन, मला चुकीच्या पद्धतीने अडकवलं, सॅम डिसुझाचा आरोप!

इंद्रलोक परिसरातील "मेरा मार्ट" ला बंदी असलेले प्लास्टिक बाळगल्याप्रकरणी ₹5000/- दंड- ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## परमबीर सिंग यांना गुन्हेगार घोषित करा; गुन्हे शाखेची मागणी



गोरेगाव खंडणी प्रकरणात मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांना गुन्हेगार घोषित करण्यासाठी मुंबई गुन्हे शाखेने कोर्टात अर्ज दाखल केला आहे. विशेष सरकारी वकील शेखर जगताप यांनी मुंबईच्या मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट कोर्टात अर्ज दाखल करून सिंग व्यतिरिक्त रियाझ भाटी आणि विनय सिंग उर्फ बबलू या इतर दोन आरोपींना गुन्हेगार घोषित करण्याचे आदेश देण्याची मागणी केली. जगताप म्हणाले, "आमच्याकडे आधीच आरोपींविरुद्ध तीन अजामीनपात्र वॉरंट आहेत, त्यामुळे आम्ही आरोपीला घोषित गुन्हेगार घोषित ...पान २ वर...

## हिंदूंवरील हल्ल्यांविरोधात भागवतांनी आंदोलन करत नरेंद्र मोदींना जाब विचारावा: संजय राऊतांचं आव्हान

***मोहन भागवत यांनी आंदोलन करत पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री शहांना जाब विचारावा, असं आव्हान संजय राऊत यांनी दिलंय.***



अमरावती शहरात शनिवारी सलग दुसऱ्या दिवशी दगडफेक, जाळपोळ झाल्याने तणाव निर्माण झाला. त्यानंतर शहरात संचारबंदी लागू करण्यात आली आहे. तसेच इंटरनेट देखील चार दिवसांसाठी बंद करण्यात आले आहे. भाजपाने पुकारलेल्या बंददरम्यान समाजकंटकांनी केलेल्या दगडफे कीत पाच पोलिसांसह नऊ जखमी झाले. शहरातील काही धार्मिक स्थळांसमोर नासधूस करण्यात आल्याने वातावरण चिघळले. जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांना लाठीमार आणि अश्रुधुराचा वापर करावा लागला.

या संपूर्ण घटनेवर शिवसेना खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

"रझा अकादमी काय म्हणत आहे, मला माहित नाही. रझा अकादमीमध्ये महाराष्ट्रात दंगली भडकवण्याच्या ताकद नाही, त्यांच्यावर सरकारनं नियंत्रण आणलंय. महत्वाचं म्हणजे त्रिपुरामध्ये असे काय घडले की त्याचे पडसाद राज्यात उमटले? बिहार, उत्तर प्रदेश, कर्नाटक, दिल्ली, मध्यप्रदेश मध्ये का नाही महाराष्ट्रातच का?, असा सवाल संजय राऊत यांनी केला. महाराष्ट्र अशांत करण्याचा हा प्रयत्न आहे," असं राऊत म्हणाले.

"बांगलादेशमध्ये हिंदू मंदिरांवर झालेल्या हल्ल्याच्या घटना गंभीर आहेत. मग गेल्या अनेक वर्षांपासून काश्मीर मध्ये हिंदू पंडिताना मारले जाते त्या विरोधात कोणी आंदोलन का नाही करत, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

तसेच मणिपूरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याविरोधात दिल्लीमध्ये आंदोलन झाले पाहिजे. हिंदूवर होणाऱ्या हल्ल्यांच्या विरोधात सर्व राष्ट्रवादी संघटनांनी एकत्र यावं आणि नेतृत्व सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले पाहिजे. मोहन भागवत यांनी पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांना हिंदूवर होत असल्याच्या हल्ल्यांचा जाब विचारावा,

" असं राऊत म्हणाले.

"रझा अकादमी जर दंगलीची जबाबदारी घेत नसेल तर मग हे सर्व कोणी केलं. त्रिपुरामध्ये काही घडलंच नाही तर व्हिडिओ आणि फोटो काय आहे. हा सर्व महाराष्ट्राला अस्थिर करण्याचा आणि तणाव निर्माण करायचा डाव आहे," असा आरोप संजय राऊत यांनी केला.

*"मिलिंद तेलतुंबडे कायम ३ स्तरीय सुरक्षेत फिरायचा, असं असतानाही…",*

## नक्षलवाद्यांवरील कारवाईवर एकनाथ शिंदेंची प्रतिक्रिया

**गडचिरोलीचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी गडचिरोली पोलिसांनी केलेल्या नक्षलवाद्यांविरोधातील कारवाईसाठी त्यांचं अभिनंदन करत कौतुक केलंय.**





गडचिरोलीचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी गडचिरोली पोलिसांनी केलेल्या नक्षलवाद्यांविरोधातील कारवाईसाठी त्यांचं अभिनंदन करत कौतुक केलंय.

गडचिरोलीचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी गडचिरोली पोलिसांनी केलेल्या नक्षलवाद्यांविरोधातील कारवाईसाठी त्यांचं अभिनंदन करत कौतुक केलंय. "मिलिंद तेलतुंबडे हा महाराष्ट्रासह छत्तीसगड, आंध्रप्रदेश नक्षल्यांचा नेता होता. तो कायम ३ स्तरीय सुरक्षेत फिरायचा. असं असतानाही पोलिसांनी त्याचा वेध घेतला आहे," असं मत यावेळी एकनाश शिंदे यांनी व्यक्त केलं. तसेच मी लवकरच जखमी जवानांना भेटायला जाणार असल्याचंही नमूद केलं.

एकनाथ शिंदे म्हणाले, "चकमकीत २६ जहाल नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला. गडचिरोली पोलीस आणि सी-६० जवानांची टीमने मिळून २६ नक्षलवाद्यांना कंठस्नान घातलंय. ही गेल्या वर्षभरातील देशातील सर्वात मोठी कारवाई आहे. त्यामुळे गडचिरोली पोलिसांचं सर्वच स्तरातून अभिनंदन होतंय. गडचिरोलीचा पालकमंत्री म्हणून मी देखील गडचिरोली पोलिसांचं अभिनंदन केलंय. ही कारवाई पोलीस अधीक्षक अंकित गोयल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक समीर शेख व सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. यात ४ जवान जखमी झालेत. त्यांना तात्काळ नागपूरला हलवण्यात आलं असून उपचार सुरू आहेत."

"सर्वात जहाल नक्षलवादी मिलिंद तेलतुंबडेलाही कंठस्नान"

"नागरिकांना, पोलिसांना मारणाऱ्या आणि मोठ्या प्रमाणावर बक्षीसं जाहीर झालेल्या ...पान २ वर...

## "सहकार भरती, नवी मुंबई ची कार्यकारिणी घोषित"



दिनांक १४/११ /२०२१ रोजी महाराष्ट्र प्रांताच्या सूचनेनुसार सहकार भरती नवी मुंबई ची कार्यकारणी महाराष्ट्र प्रदेश सह संघटन प्रमुख श्री प्रवीण बुलाख तसेच श्री शैलेश दुरगुडे, राजू ठाणगे, विनोद म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत घोषित करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यवाह श्री योगेश साळुंखे उपस्थीत होते. सहकार क्षेत्रात कार्य करणारे सहकार भारती ही राष्ट्रीय पातळीवरील संघटना आहे. सहकाराच्या माध्यमातून सामान्य लोकांचे जीवनमान उंचावणे हा सहकार भारतीचे प्रमुख उद्दिष्ट आहे."विना सहकार, नही उद्धार" हे सहकार भारतीचे ब्रीद वाक्य आहे. विना संस्कार नाही सरकार या प्रेरणेने सहकार भरती नवी मुंबईसह देशभर कार्य करत आहे. नवी मुंबई सहकार भारती कार्यकारणी मध्ये अध्यक्ष श्री प्रमोद जोशी, उपाध्यक्ष डॉ. भगवान पवार, सचिव ॲड चंद्रकांत निकम, महिला प्रमुख संगीता बांगर, गृहनिर्माण प्रकोष्ठ संतोष कडू कायदेविषयक सल्लागार अड. सिद्धेश पाटील संघटन प्रमुख रश्मी सकपाळ, सह संघटन प्रमुख संतोष मिसाळ त्याच सोबत तालुका प्रमुख व सर्व सहप्रमुख तसेच विविध प्रकोश्ट प्रमुख यांचाही नियुक्त आज करण्यात आली. या कार्यक्रमस प्रमुख पाहुणे श्री योगेश साळुंखे यांनी राष्ट्रीय चारित्र्य व सहकार भारती चे काम याचे महत्त्व स्पष्ट केले. संस्कारित कार्यकर्त्यांच्या सहकार्याने आपल्याला भारत मातेचे उत्थान करायचे आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमात भूतपूर्व अध्यक्ष श्री कृष्णाजी धुमाळ यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष प्रमोद जोशी यांच्याकडे कार्यभार सोपविला व संपूर्ण समितीसाठी शुभेच्छा दिल्या. त्याच सोबत डॉ भगवान पवार यांनी सहकार भारती च्य पुढील कार्यक्रमाची ...पान २ वर...

## माजी गृहमंत्री अनिल देशमुखांचा जेलमधील मुक्काम पुन्हा वाढला; 29 नोव्हेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी



मुंबई : कथित मनी लॉंड्रिंग प्रकरणी न्यायायलीन कोठडीत असलेले माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा जेलमधील मुक्काम आणखीन वाढला आहे. अनिल देशमुख यांना 29 नोव्हेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. आज अनिल देशमुख यांच्या ईडी कोठडीची मुदत संपली. यामुळे देशमुखांना कोर्टात हजर करण्यापूर्वी त्यांची वैद्यकीय चाचणी करुन त्यांना कोर्टात हजर करण्यात आले. याआधी शुक्रवारी मुंबईतील विशेष न्यायलायाने देशमुखांच्या ईडी कोठडीत सोमवारपर्यंत वाढ केली होती. आज मुदत संपल्यामुळे पुन्हा देशमुखांना न्यायलयात हजर करण्यात आले. त्यावेळी न्यायालयाने देशमुख यांना आता 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली आहे. गेल्या सुनावणी दरम्यान न्यायालयात अनिल देशमुखांच्या वकिलांनी ईडी कोठडी वाढवण्याच्या निर्णयाला विरोध दर्शवला होता. कथित मनी लॉंड्रिंग प्रकरणातील अन्य आरोपी सचिन वाझेला अद्याप अटक का केली नाही. तसेच परमबीर सिंग यांना चौकशीसाठी का बोलावण्यात आले नाही, असे प्रश्न देशमुखांच्या वकिलांनी उपस्थित केले होते. अनिल देशमुख । ...पान २ वर...

## 54 वर्षीय वाहन चालकाकडून गतीमंद मुलीचे लैंगिक शोषण, दोन वर्ष सुरु हा प्रकार



पुणे- माणुसकीला काळिमा फासणारी घटना पुण्यातला घडली आहे. 12वर्षाच्या अल्पवयीन गतिमंद मुलीचं लैंगिक शोषण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी 54 वर्षीय चालकास अटक केली आहे. कोंढवा येथील महिलेने तक्रार दिली आहे. आरोपी ...पान २ वर...

## पुन्हा गुजरातमध्येच ड्रग्ज

*ATS ची मोठी कारवाई, पाकिस्तानातून आलेले 600 कोटीचे ड्रग्ज जप्त, कनेक्शन काय?*



गांधीनगर : गुजरात एटीएसने मोरबी जिल्ह्यात ड्रग्जच्या विरोधात मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी मलिया मियाना येथून 120 किलो ड्रग्ज जप्त केले आहे. या ड्रग्जची बाजारातील किंमत अंदाजे 600 कोटी रुपये असल्याची माहिती आहे. या ...पान २ वर...

## महिलेची हातचलाखी; ज्वेलर्सच्या दुकानातून हातोहात लांबवले सोन्याचे ब्रेसलेट



पुणे: ज्वेलर्सच्या दुकानात ग्राहक बनून आलेल्या एका महिलेची हातचलाखी सीसीटीव्ही कॅमेऱ्याने पकडली. ज्वेलर्समधील कामगाराचे लक्ष विचलित करून महिलेने दुकानातील सोन्याचे ब्रेसलेट लांबवले. सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर महिलेचा प्रताप उघडकीस आला आहे. पुण्यातील आळंदी रोड येथील भोसरी येथील एका ज्वेलर्सच्या दुकानात महिलेने चोरी केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी महिलेविरोधात गुन्हा दाखल केला आहे. भोसरी येथे ज्वेलर्सचे दुकान आहे. या दुकानात ग्राहक ...पान २ वर...

## ५ वर्षे तुरूंगात, महिनाभरापूर्वी सुटून आल्यानंतर घाटकोपरमध्ये केली महिलेची हत्या



मुंबई: मुंबईत एका महिलेच्या हत्येचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे. महिनाभरापूर्वीच तुरुंगातून सुटून बाहेर आलेल्या ४१ वर्षीय आरोपीला शनिवारी पोलिसांनी पुन्हा अटक केली आहे. घाटकोपरमध्ये एका महिलेची हत्या केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. नवी मुंबईतील एका महिलेची हत्या केल्याप्रकरणी तो पाच वर्षे तुरुंगात होता. महिनाभरापूर्वी तुरुंगातून बाहेर आल्यानंतर त्याने आणखी एका महिलेची हत्या केल्याचे उघड झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २ नोव्हेंबर रोजी घाटकोपरमधील पंतनगरमध्ये एका ५२ वर्षीय महिलेची हत्या झाली होती. या महिलेची दगडाने ठेचून हत्या करण्यात आली होती. महिलेचे हात, पाय बांधले होते आणि तोंडावर पट्टी बांधली होती. पोलिसांनी तपास करून या हत्येचा छडा लावला आहे. या प्रकरणी ४१ वर्षीय आरोपीला अटक करण्यात आली आहे. अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्यानंतर प्रतिकार केल्याने त्याने महिलेची हत्या केली असावी, अशी शक्यता प्राथमिक तपासात व्यक्त केली जात आहे. या आरोपीने यापूर्वी नवी मुंबईतील वाशी परिसरातही एका महिलेची हत्या केली होती. २०१६ मध्ये त्याने हे कृत्य केले होते. या प्रकरणात आरोपी तुरुंगात कैद होता. याचवर्षी ऑक्टोबरमध्ये तो तुरुंगातून बाहेर आला आहे. घाटकोपरमधील महिलेच्या हत्येचा असा लागला छडा घाटकोपरच्या ...पान २ वर...

## ऑनलाईन वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या महिलेस भाईदर पोलिसांनी केली अटक



मिरारोड : न्यू गोल्डन नेस्ट येथे वेश्याव्यवसाय करण्याऱ्या महिला वेश्यादलाल हिस अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, भाईंदर यांनीं दिनांक १०/११/२०२१ रोजी केली अटक. मिरारोड परिसरात राहणारी महिला सपना व तीचा साथीदार विनोद हे मोबाईल द्वारे व्हाट्सऍप वरून गिऱ्हाईकांना मुलींचे फोटो पाठवून नंतर मुलींस वेश्यागमनासाठी मिरा-भाईंदर परिसरातील लॉजमध्ये गिऱ्हाईकास रुम बुक करावयास लावून त्यांच्याकडुन वेश्यागमनाचा मोबदला घेवुन मुली पुरवितात अशी माहिती प्राप्त झाली या बातमीच्या अनुषंगाने श्री. एस. एस. पाटील, वरिष्ठ पोलीस ...पान २ वर...

# नागपूर रेल्वेच्या दोन अधिकाऱ्यांविरुद्ध छेडखानीचा गुन्हा, महिला कर्मचाऱ्यानी केली होती तक्रार

नागपूर रेल्वेतील दोन वरिष्ठांची तक्रार महिला अधिकाऱ्यानी सदर पोलिसांत केली. या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात सदर पोलिसांनी छेडखानी आणि जातिवाचक शिविगाळीचा गुन्हा दाखल केलाय. वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक विकास कुमार कश्यप आणि सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक अविनाश कुमार आनंद अशी गुन्हा दाखल झालेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत. फाईल मागण्याच्या बहाण्याने बोलावून त्रास सदर पोलीस ठाण्याअंतर्गत दक्षिण पूर्व मध्ये रेल्वेचा विभाग येतो. तक्रारकर्ती महिला अधिकारी 57 वर्षांची आहे. पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार, वरील दोन्ही अधिकारी त्यांना वारंवार कॅबीनमध्ये बोलावित होते. जातिवाचक शिविगाळ करून छेडखाणी करीत होते.

याविरोधात आवाज उचलला असता सदर महिला अधिकाऱ्याचा आणखी त्रास अधिकच वाढला. फाईल मागण्याच्या बहाण्याने बोलावून त्रास दिला जात असल्याची



महिलेची तक्रार आहे. या महिला अधिकाऱ्याने ऑगस्ट 2021 मध्येच याची लेखी तक्रार सदर पोलिसांत केली होती. तक्रारीची चौकशी करण्यात आली. त्यानंतर सदर पोलिसांनी आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला. सदरच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक भारती गुरनुले तपास करीत आहेत. गुंड राजू भद्रेच्या पत्नीविरोधात गुन्हा

वाठोड्यातील जमीन फसवणूक प्रकरणाला कलाटणी मिळाली. गुंड राजू भद्रेंची पत्नी आणि साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

वर्धमाननगरातील तवरलाल छाबरानी, सक्करदऱ्यातील संगीत राहाटे, सुजातानगरातील विजय पत्रे, राणी दुर्गावती नगरातील मुरलीधर निमजे अशी आरोपींची नावे आहेत. या प्रकरणाशी संबंधित जमीन बळकवण्याच्या प्रयत्नात दोन गटांत वाद आहे. आदिवासी उन्नती गृहनिर्माण सोसायटीतील ही जमीन व्वेटा कॉलनीतील अशोक खट्टर यांनी 40 लाखांत खरेदी केली होती. राजू भद्रे आणि त्याच्या साथीदारांनी बनावट कागदपत्र बनवून या जमिनीवर कब्जा केल्याचा आरोप आहे. याविरोधात खट्टर यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. न्यायालयाने पाच जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याचा आदेश दिला. अधिक तपास केल्यास या प्रकरणी आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे.

## 54 वर्षीय वाहन चालकाकडून

चालक हा कात्रज येथील रहिवाशी आहे.

दाखवत असे अश्लील व्हडिओ 2019 पासून ते 10 नोव्हेंबर 2021 पर्यंत पीडित मुलीला वाहनातून शाळेत घेऊन जाण्याचे आणि शाळेतून घरी आणण्याचे काम करत होता. पीडित गतिमंद मुलीला शाळेत घेऊन जाताना तसेच घरी परतताना रस्त्यात गाडी थांबत लैंगिक चाळे करत असत. तसेच अश्लील व्हडिओ दाखवत त्याप्रमाणे कृती करण्यास भाग पाडत होता. पीडित मुलींने याबाबत आपल्या शाळेतील शिक्षिकेला माहिती दिल्यानंतर संबंधित प्रकरणाचा उलघडा झाला. पोलिसांनी घटनेची तातडीने दाखल घेत आरोपीवर गुन्हा दाखल करत अटक केली. पाणी देण्याच्या बहाण्याने घरात बोलावले दुसरीकडं पिण्यासाठी पाणी मागण्याच्या बहाण्याने अल्पवयीन मुलीवर वारंवार बलात्कार करून गर्भवती केल्याप्रकरणी 52 वर्षीय नराधमाला 10 वर्षे सक्तमजुरी व 1 लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. अप्पा यशंवत साळवे (वय 52, रा. कुसगाव, लोणावळा) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे लोणावळा परिसरात ही घटना घडली होती. यामध्ये 16 वर्षीय पीडित मुलीच्या आई-वडिलांचा मृत्यू झाल्याने ती आजीच्या सोबत राहत होती. मुलीच्या घर शेजारी रेल्वे वसाहतीतील रिकाम्या बंगल्यात आरोपी राहत होता. फेब्रुवारी 2017 मध्ये आरोपीने पिडित मुलीला हाक मारुन पिण्याचे पाणी देण्याच्या बहाण्याने घरात बोलावले व तिच्यावर बलात्कार केला. ही घटना कोणाला सांगितल्यास तिला व तिच्या लहान भावाला मारुन टाकण्याची धमकी दिली. त्यानंतर सातत्याने हाच प्रकार केला. काही महिन्यांनी मुलीची पोट दुखू लागल्याने तिला डॉक्टरांकडे नेले. तेव्हा ती गरोदर असल्याचे डॉक्टर तपासणीत आढळून आल्यानंतर हा घृणास्पद प्रकार समोर आला.

त्यानंतर पॉक्सो कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यानच्या काळात या पीडित मुलीने बाळाला जन्म दिला पोलिसांनी पिडिता, आरोपी व तिच्या बाळाचे डी एन ए नमुने घेतले. त्याचा अहवाल सकारात्मक आला. या खटल्या प्रकरणी पोलिसांनी जवळपास 7 साक्षीदारांची साक्ष नोंदवली. मात्र याप्रकरणातील महत्त्वाची साक्ष असलेल्या पीडिता व तिच्या लहान भावाचे जानेवारी 21 मध्ये निधन झाले.

## माजी गृहमंत्री अनिल देशमुखांचा

नोव्हेंबर रोजी केली होती ईडीने अटक अनिल देशमुख यांना 1 नोव्हेंबर रोजी ईडीने अटक केले होते. विशेष सुट्टीकालीन न्यायालयाने 6 नोव्हेंबर रोजी नायालयीन कोठडीत रवानगी करीत ईडी कोठडी वाढवण्याची मागणी फेटाळली होती. त्याच्या एक दिवसानंतरच मुंबई उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा आदेश रद्दबातल करीत देशमुख यांना 12 नोव्हेंबर पर्यंत ईडी कोठडीत पाठवले होते. ही मुदत संपताच देशमुख यांना शुक्रवारी पीएमएलएच्या विशेष न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यावेळी न्यायालयाने त्यांच्या ईडी कोठडीत आणखी तीन दिवसांची वाढ केली होती. सचिन वाझेने अनिल देशमुखांच्या आदेशावरुन बार मालकांकडून पैसे वसुल करण्यात महत्वपूर्ण भूमिका निभावल्याचे फिर्यादीने म्हटले होते. ईडी याप्रकरणी वाझेचा जबाब नोंदवण्यासाठी संबंधित न्यायलयाची अनुमती घेण्याची प्रक्रिया करीत आहे. वाझे जबाबानुसार नवीन पुराव्यांबाबत विचारपूस करण्यासाठी देशुमखांना कोठडीत ठेवणे जरुरी असल्याचे ईडीने म्हटले आहे. नेमकं काय आहे प्रकरण? मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना पत्र लिहून माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केले होते. अनिल देशमुखांनी सचिन वाझेला प्रत्येक महिन्याला 100 कोटी रुपयांचं वसुलीचं टार्गेट दिलं होतं, असा खळबळजनक आरोप परमबीर सिंग यांनी पत्राच्या माध्यमातून केला होता. यानंतर निलंबित एपीआय सचिन वाझे यांच्यावरही या प्रकरणातील प्रमुख आरोपी म्हणून अटकेची कारवाई करण्यात आली. तसंच देशमुख यांचे खासगी सचिव संजीव पालांडे आणि खासगी सहायक कुंदन शिंदे यांनाही याचप्रकरणात गेल्या दोन महिन्यांपूर्वी अटक करण्यात आली होती.

# नोएड्यातील पोलीस ठाण्यात अजब तक्रार दाखल, पतीच्या सांगण्यावरुन पत्नीविरोधात हनीट्रॅपचा गुन्हा




नवी दिल्ली : नोएडातील एका पोलीस ठाण्यात एक विचित्र तक्रार दाखल करण्यात आली आहे. एका तरुणाने पोलीस ठाण्यात येऊन पत्नीविरोधात हनी ट्रॅपचा गुन्हा दाखल केला आहे. आपली पत्नी भोळ्या लोकांना हनी-ट्रॅपमध्ये अडकवते आणि ब्लॅकमेलिंगद्वारे पैसे उकळते. एवढेच नाही तर तिने आतापर्यंत अनेकांना हनीट्रॅपचा शिकार बनवले आहे, असे सदर तरुणाने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. तरुणाच्या तक्रारीवरून पोलिसांनी पत्नीविरुद्ध सेक्टर 49 पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल केला आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

परस्पर संमतीने लैंगिक संबंध

गौतम बुद्ध नगरमधील डीसीपी महिला सुरक्षा वृंदा शुक्ला यांनीही या प्रकरणाची पुष्टी करताना सांगितले की, सेक्टर 41 मध्ये राहणारे दीपक कुमार यांनी अशी तक्रार दाखल केली आहे. एका डेटिंग ॲपवर तरुण या महिलेला भेटल्याचेही अहवालात उघड झाले आहे. महिलेने ॲपवर नोंदणी करताना सिंगल असल्याचे लिहिले होते. दोघांमध्ये बोलणे सुरु झाले आणि त्यानंतर महिलेने त्याला ओखला येथे भेटायला बोलावले. तेथे दोघांच्या परस्पर संमतीने शारीरिक संबंध निर्माण झाले.आरोप करताना दीपकने असेही सांगितले की, त्यानंतर त्याला ब्लॅकमेल केले जाऊ लागले. एवढेच नाही तर त्याच्याकडून मोठ्या रकमेची मागणीही करण्यात आली होती. पैसे न दिल्यास दीपकला बलात्काराच्या आरोपाखाली तुरुंगात जाण्याची धमकी देण्यात आली, त्यानंतर दीपकने दबावाखाली येऊन महिलेशी लग्न केले. जेव्हा दीपकने चौकशी केली तेव्हा त्याला कळले की सदर महिला आधीच विवाहित आहे. परंतु सोशल मीडियावर ती स्वतःला अविवाहित असल्याचे सांगते.

लग्नानंतरही ब्लॅकमेलिंग करते

महिला लग्नानंतरही अशाप्रकारे ब्लॅकमेलिंग करत असून डेटिंग ॲप्सच्या माध्यमातून मुलांशी मैत्री करते. नंतर त्यांना आपल्या जाळ्यात अडकवून त्यांच्याशी शारीरिक संबंध ठेवत असल्याचा आरोपही एफआयआरमध्ये करण्यात आला आहे. त्यानंतर त्यांच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन मोठी रक्कम वसुल करते.

# अमेझॉनवरुन 1 टन गांजाची तस्करी; ऑनलाईन अंमली पदार्थ विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

मध्य प्रदेश : डिजिटलायझेशनच्या काळात व्यवहार आणि जीवनपद्धती जितकी सोपी झाली आहे, तितकेच त्याचे गैरवापरही होत असल्याचे वारंवार समोर येत आहे. गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी सरकार जितके कायदे कडक करीत आहेत तितकंच गुन्हेगारही गुन्हे करण्यासाठी नवनवीन क्लुप्त्या शोधत आहेत. असाच एक धक्कादायक प्रकार मध्य प्रदेशात उघडकीस आला आहे. घरबसल्या शॉपिंग करण्यासाठी प्रसिद्ध असलेली ई-कॉमर्स कंपनीद्वारे चक्क गांजाच्या तस्करी करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे.



ऑनलाईन गांजा विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश मध्य प्रदेशातील भिंडमध्ये पोलिसांनी शनिवारी ऑनलाइन गांजा विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला असून टोळीच्या दोन सदस्यांना अटक केली आहे. पोलिसांनी आरोपींकडून 20 किलो अमली पदार्थ जप्त केला आहे. भिंडचे पोलीस अधीक्षक (एसपी) मनोज कुमार सिंह यांनी सांगितले की, माहिती मिळाल्यावर कल्लू पवैया (30) आणि ढाबा मालक ब्रिजेंद्र तोमर (35) यांना शनिवारी भिंडमधील ग्वाल्हेर रोड येथून अटक करण्यात आली. आरोपींकडून 20 किलो गांजा जप्त करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

कढीपत्ता विक्रीच्या नावाखाळी गांजा तस्करी आरोपी कल्लूने विशाखापट्टणम येथे बनावट पॅन क्रमांक आणि जीएसटी क्रमांकासह ऑनलाइन ई-कॉमर्स कंपनी अमेझॉनवर कढीपत्ता विकण्यासाठी आपल्या फर्मची नोंदणी केली होती. याद्वारे ग्वाल्हेर, भोपाळ, कोटा, आग्रा आणि देशाच्या इतर भागांत कढीपत्त्याच्या नावाने गांजा आयात केला जात होता. या व्यवसायात ब्रिजेंद्र हा कल्लूला मदत करायचा. चार महिन्यांत एक टन गांजा विकला कल्लूने आतापर्यंत एक टन गांजा विकून एक कोटी दहा लाख रुपयांचा व्यवसाय केला आहे. कल्लूने आपली कंपनी बनावट पॅन नंबर आणि जीएसटी नंबरद्वारे कंपनी चालवली आणि या व्यवसायात ई-कॉमर्स कंपनीला 66.66 टक्के नफाही मिळाला, अशी माहिती एसपी मनोज कुमार सिंह यांनी दिली. दरम्यान, आरोपी एका आघाडीच्या ई-कॉमर्स कंपनीच्या माध्यमातून त्यांची टोळी चालवत होते आणि या कंपनीला दोन तृतीयांश नफाही मिळत होता. पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, ई-कॉमर्स कंपनीवर अशा अंमली पदार्थांच्या व्यापारासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल कारवाई केली जाऊ शकते का, याबाबत तपास सुरु असल्याचे मनोज कुमार यांनी सांगितले.

## पृष्ठ १ वरुन

### परमबीर सिंग यांना गुन्हेगार

करण्यासाठी हा अर्ज करत आहोत.” दरम्यान, या अर्जावर न्यायालयात सोमवारी सुनावणी होणार आहे. ३० ऑक्टोबर रोजी त्याच दंडाधिकारी न्यायालयाने परमबीर सिंग आणि इतर दोन जणांविरुद्ध दुसरे अटक वॉरंट जारी केले होते. जगताप यांनी दाखल केलेल्या अर्जात असे म्हटले आहे की, “अजामीनपात्र वॉरंट जारी करूनही आरोपी अद्याप समोर आलेले नाही आणि ते बेपत्ता आहेत, जसे तपासातून निष्पन्न झाले आहे. त्यामुळे त्यांना गुन्हेगार घोषित केले जावे.” तिघांसाठी अजामीनपात्र वॉरंट जारी केल्यानंतर, वॉरंटची अंमलबजावणी करण्यासाठी अधिकाऱ्यांना सांगण्यात आले. मात्र, अधिकारी त्यांनी दिलेल्या पत्त्यावर शोधू शकले नाहीत. तसेच या प्रकरणी गुन्ह्याची नोंद झाल्याच्या दिवसापासून आरोपी कुठे आहेत, हे माहित नसल्याचं समोर आलंय.

### नक्षलवाद्यांवरील कारवाईवर

नक्षलवाद्यांवर विशेष कारवाई करण्यात आलीय. यात सर्वात जहाल नक्षलवादी मिलिंद तेलतुंबडे हा होता. तो महाराष्ट्रासह आजूबाजूच्या राज्यातील नक्षल्यांचा नेता होता. तो केंद्रीय समितीचाही सदस्य होता. त्याला ३ स्तराचं सुरक्षा कवच होतं. तो कायम या सुरक्षा व्यवस्थेसह फिरत होता. असं असतानाही आपल्या गडचिरोली पोलिसांनी त्याचा वेध घेतलाय. त्याच्यावर राज्यात ५० लाखांपेक्षा अधिकचं बक्षीस होतं. इतर राज्यात देखील त्याच्यावर अनेक बक्षीसं होती. मिलिंद तेलतुंबडेचा एनकाऊंटर केवळ राज्यासाठी नाही, तर देशातील इतर नक्षलग्रस्त राज्यांनाही धक्का आहे,” असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.“एखादी मोठी कारवाई झाल्यानंतर त्याला काहीवेळी नक्षलवाद्यांकडून प्रत्युत्तर येतं. पोलिसांवर वेगवेगळ्या पद्धतीने हल्ले केले जातात. म्हणून पोलीस सतर्क आहेत. सामान्य नागरिकांच्या जीवालाही धोका पोहचू नये याची काळजी पोलीस घेत आहेत. परिस्थिती सामान्य आहे, चिंता करण्याची गरज नाही. भितीचं वातावरण बिलकुल नाही,” असंही एकनाथ शिंदे यांनी नमूद केलं.

### महिलेची हातचलाखी;

बनून आलेल्या एका महिलेने कामगाराला बोलण्यात गुंतवून तेथील सोन्याचे ब्रेसलेट लांबवले. साडेसव्वीस हजार रुपये किंमतीचे ब्रेसलेट चोरून ती पसार झाली. शुक्रवारी (ता.१२ ) ही घटना उघडकीस आली. या प्रकरणी विरेंद्र मेहता यांनी भोसरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून एका महिलेविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मेहता हे त्यांच्या ज्वेलर्सच्या दुकानातील उर्वरित दागिने दररोज रात्री तपासतात. दिवसभरात किती दागिने विकले गेले, किती शिल्लक आहेत, याबाबतची माहिती घेत असतात. १२ नोव्हेंबरलाही रात्री त्यांनी नेहमीप्रमाणे दुकानातील शिल्लक दागिन्यांची माहिती घेतली. मात्र, एक सोन्याचे ब्रेसलेट नसल्याचे त्यांना आढळले. काउंटरवर काम करणाऱ्या कामगाराच्या स्टॉकमध्ये ते कमी आढळले. मेहता यांनी ताबडतोब दिवसभरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यावेळी संध्याकाळी सव्वापाच ते पावणे सहा वाजताच्या दरम्यान, एक महिला काउंटरवर आली होती. साडेसव्वीस हजार रुपये किंमतीचे ब्रेसलेट चोरताना ती महिला दिसून आली.याबाबत मेहता यांनी भोसरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या महिलेविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, तिचा शोध घेतला जात आहे.

### "सहकार भरती, नवी मुंबई

माहिती दिली. मागील दोन वर्ष चे लेखा जोगा व कार्य अहवाल सचिव ॲड चंद्रकांत निकम यांनी मांडला तर कार्यक्रम चे संचलन रस्मी सकपाळ यांनी केली. तसेच नवानिरवचीत अध्यक्ष प्रमोद जोशी यांनी सहकार भारती नवी मुंबईचे तलागळत पर्यंत पोचण्यासाठी प्रय्नशील राहू असा विश्वास व्यक्त केला. शेवटी कार्यक्रम ची सांगता श्री प्रवीण बुलाख यांनी कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडला व महाराष्टरातील तरुण समिती साठी शुभेच्छा देवून उपस्थित सर्वाचे आभार व्यक्त केले.

### ऑनलाईन वेश्याव्यवसाय

निरीक्षक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, भाईंदर यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना जय महल लॉज परिसरात, न्यु गोल्डन नेस्ट, भाईंदर पुर्व या ठिकाणी पाठवून सत्यता पडताळुन पोलीस पथकासह छापा कारवाई करण्यात आली व महिला वेश्या दलाल सपना मुखर्जी हिला रंगेहाथ वेश्यागमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०१ पीडित मुलीची सुटका करण्यात आली. आरोपी सपना मुखर्जी, व तिचा फरार साथीदार विनोद यांच्या विरुध्द नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. महेश पाटील, पोलीस उप. आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील, पो. हवा. उमेश पाटील, रामचंद्र पाटील, पो.ना. गावडे, वैष्णवी यंबर, पो.शि. केशव शिंदे, सुप्रिया तिवले यांनी कामगिरी केली आहे.

### ५ वर्षे तुरूंगात, महिनाभरापूर्वी

पंतनगर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने मुंबईतील मानखुर्द परिसरातून आरोपीला अटक केली. २ नोव्हेंबरला घाटकोपरच्या पंतनगर परिसरात भाजी मार्केटमध्ये एका महिलेचा मृतदेह आढळला होता. महिलेचे हातपाय बांधलेले होते, तिच्या तोंडावर पट्टी बांधलेली होती. महिलेसोबत अतिप्रसंगाचा प्रयत्न झाल्याचे प्रथमदर्शनी दिसत होते. महिलेच्या डोक्यावर दगड घालून तिची हत्या केल्याचे जखमांवरून स्पष्ट झाले होते. या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला होता. पोलिसांनी आजूबाजूचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यात आरोपीचा चेहरा अस्पष्ट दिसत होता. पोलिसांनी तपास सुरू कला असता, आरोपी मुंबईतील विविध परिसरांत फुटपाथवर फिरत असतो आणि तो बेघर असल्याची माहिती मिळाली. तपास केला असता, वाशीत एका महिलेच्या हत्या प्रकरणातही तो सहभागी असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी अखेर आरोपीला मानखुर्द रेल्वे स्थानक परिसरातून अटक केली.

### पुन्हा गुजरातमध्येच ड्रग्ज

प्रकरणाचे धागेदोरे पाकिस्तानातील ड्रग माफिया खालिद बख्शशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे. पाकिस्तानातूनच हे अंमली पदार्थ भारतात आणले जात असल्याची माहिती आहे. ड्रग्जसोबतच पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे. या प्रकरणात बाहेर येत असलेल्या खालिद नावाच्या व्यक्तीचा संपर्क थेट जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेशी असल्याची माहिती आहे. भारतात पाठवण्यात आलेल्या या ड्रग्जच्या खेपेची पटकथा दुबईमध्ये लिहिण्यात आल्याचेही बोललं जात आहे. पाकिस्तानी ड्रग्ज माफिया खालिदने जब्बार आणि गुलाम नावाच्या दोन भारतीय तस्करांची दुबईतील सोमालिया कॅन्टीनमध्ये भेट घेतली होती. सध्या पोलिसांनी या दोघांनाही अटक केली आहे. विशेष म्हणजे याआधीही पाकिस्तानी ड्रग माफिया खालिदने ड्रग्जची मोठी खेप भारतात पोहोचवण्याचा प्रयत्न केला होता. याच आठवड्यात गुजरातमधील पोलिसांनी देवभूमी द्वारका आणि सुरतमध्ये हेरॉइनसह अनेक अंमली पदार्थ जप्त केले आहेत. यावेळी तीन आरोपींनाही अटक करण्यात आली होती. देवभूमी द्वारका येथील ड्रग्ज पॅडलरकडून 88.25 कोटी रुपये किमतीचे 17 किलो ड्रग्ज जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली होती. महाराष्ट्रातील जळगावातून 1500 किलो गांजा जप्त राज्यात सध्या ड्रग्ज (Drugs) विरोधात मोठ्या प्रमाणात कारवाया केल्या जात आहेत. यादरम्यान आता मुंबई (Mumbai) एनसीबीच्या (NCB) पथकाने जळगावात (Jalgaon) एक मोठी कारवाई करत तब्बल 1500 किलो गांजा जप्त केला आहे. एनसीबीच्या पथाकाने यावेळी दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं असून पुढील कारवाई सुरु आहे. एएनआय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रतील जळगाव जिल्ह्यातील एरंडोलजवळ एनसीबीच्या पथकाने तब्बल 1500 किलो गांजा जप्त केला आहे. याप्रकरणी एनसीबीने दोन जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. हा गांजा आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथून आणला जात होता.

संपादकीय...



## लढा अन्यायाविरोधात हवा, निसर्गाविरोधात नव्हे!

गेली पन्नास वर्ष तुम्ही अभिनय, संगीत, सादरीकरणात प्रयोगशील आहात... मात्र 'ऑनलाइन' परवलीचा शब्द झाला तेव्हा काय करता आलं? जिवंत सादरीकरणाला पर्याय नाही याबद्दल मी आग्रहीच आहे. मला खरं तर, ती दुधाची तहानही वाटत नाही. ज्याचं सामर्थ्यच मुळी जिवंत सादरीकरणात आहे त्याला तुम्ही बाकीची कोंदणं लावली की, त्याचा फॉर्मच बदलतो. एखाद्याचं लाईव्ह गाणं ऐकणं, नाटक बघणं, अभिवाचन ऐकणं आणि तेच स्क्रीनवर बघणं यात माध्यमच बदलल्यामुळे प्रचंड फरक पडतो. तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीमुळं प्रचंड बदल घडत आहेत हे खरंच आहे, बदल असाही आहे की, पूर्वी आपण अभिमानानं सांगायचो, माझ्याकडं अमुक गायकाचं इतकं कलेक्शन आहे वगैरे. आता यू ट्यूबवर असे दुर्मीळ साठे सहजच उपलब्ध होऊ लागल्यावर आपल्याकडची पुंजी अचानक अडगळच झाली नाही का?, 'लाईव्ह'ची मजा अपलोड केलेल्या मैफिलीत येऊ शकत नाही. उगीच तुलना करण्यात अर्थ नाही. तरीही, कोविड काळातली नवीन पिढीची तडफड मी समजू शकतो.मी इतक्या सलगपणे क्रिएटिव्ह काम करत आलोय की, एकदोन वर्षं गप्प राहाण्यानं माझं विशेष काही बिघडत नाही. सारखं करत राहावं हा माझा स्वभावही नव्हे. मात्र, अनुभवाने काही 'प्रयोगां'मधला फोलपणा कळतो. काहींनी नाटकं, संगीत असे ऑनलाईन कार्यक्रम तिकिटं लावून केले. पहिल्या वर्षी नवेपणात जितके ते यशस्वी झाल्यासारखे वाटले तसं पुढच्या टप्प्यात घडलं नाही. अशी धाडसं मग, कमी होत गेली. शिवाय 'ऑनलाइनमुळे आमचा कंटेंट जगभर उपलब्ध झाला' याला काही विशेष अर्थ आहे असं मला वाटत नाही. जगाच्या एवढ्या मोठ्या पसाऱ्यात शंभरभर तिकिटं खपली तर, 'जगभरपणा'चं गणित काय?, त्यामुळे लाईव्ह, थेट कार्यक्रम सुरू होतील तेव्हा लोक निर्भयपणे तेच पाहतील असा जिवंत सादरीकरणाबाबतीत माझा विश्वास आहे.सक्तीच्या विलगीकरणात माणसांनी आपल्या भवतालाकडे बघायची नजर बदलली...तसं त्या त्या काळात वाटतं आपल्याला, की, शेजाऱ्यांवरचं प्रेम व विश्वास वाढेल, लोकांना काटकसरीची सवय लागेल, निसर्गानं माणसाला कोविडच्या उद्रेकातून अशी चपराक दिलीय की, ते निसर्गाविषयी सजग होतील वगैरे वगैरे! माझ्या मते काहीही परिणाम उरणार नाही. कोरोनाविषयक बंधनं नाही पाळली तर, जीवावर बेतणार होतं, म्हणून लोकांचा नाईलाजच होता. त्या अडकलेपणातून लोकांनी सुचलं ते केलं. दिवाळीत सगळं खुलं झाल्यावर बाजारपेठा, मॉल्स, देवळं सगळीकडे तितकीच गर्दी होती. फार चांगल्या गोष्टी आपण फक्त कल्पनेत बघतो, प्रत्यक्षाशी त्याचा सुतराम संबंध नसतो असं मला अनुभवांती म्हणता येतं. तात्कालिक आदर्श भावना हे अळवावरचं पाणी.एकावेळी अनेक गोष्टींत असायचं हे आजच्या पिढीचं जगणं. तुम्ही एकाग्रता कशी साधता? अनेक ठिकाणी असण्यानं मला सुचतच नाही, हा सवयीचा परिणाम आहे. पिढी बदलण्याचा काळ अडीच तीन वर्षाइतका कमी झाला आहे. त्यातून अलीकडच्या पिढीला कशातून काय मिळेल याचा अंदाज येणं कठीण झालं आहे. या झपाट्यात वाहून न जाणारे व स्वत:च्या मर्जीला जगणारे तरूण एखाद दोन टक्केच असतील. मध्ये एक मुलाखत पाहिली, त्यात तरूण गायिका म्हणत होती, 'मी जे सादर केलं ते यापूर्वी कधीही केलं गेलेलं नाही. हा प्रयोग अनोखा आहे.' अशा दाव्यांवर माझा भरवसा नाही. तुम्ही जे करता ते तुमच्या कलाकृतीतून, तुमच्या म्हणण्यातून, वागण्यातून, निवडीतून सिद्ध होऊ दे ना ! आमच्या पिढीला एकाग्रतेशिवाय पर्याय नव्हता. जे करायचं ते समोर आलं की त्यावरच एकचित्त व्हायचं, आपोआपच. इतक्या पर्यायांची उपलब्धताही नव्हती. आता सोयीप्रमाणे लोकांच्या एकाग्रतेला फांद्या फुटल्यात असं म्हणावं लागेल, पण, दुसऱ्या बाजूला मला वाटतं, त्यांच्या मुख्य कामात ते एकाग्र असतात व बाकीचं 'चालसे' असेल. अलीकडं गाण्यातले शब्द गायबच झाले आहेत...अलीकडची फार गाणी ऐकली नाहीत. गाण्यांचे कार्यक्रम असतात तेव्हा अगदीच मोजके अपवाद वगळता लोक जुन्या गाण्यांचेच कार्यक्रम करत राहातात. नवं दिलं तर, लोक स्वीकारतात हा 'शब्दवेध'च्या माध्यमातून तीस वर्षांचा आमचा अनुभव. गजानन वाटवेंसारखा माणूसही त्या काळात नव्या रचना सतत सादर करायचा. भावगाणी, देवगाणी.. अशा कुठल्या कुठल्या स्मरणरंजनात रमायला लोकांना फार आवडतं. किंवा मग, नवं करतोय म्हणून यूट्यूबसारख्या सोप्या झालेल्या माध्यमातून 'करा व विसरा' या खात्यात भर टाकत राहायची ! हे कलेनं जगणं नव्हे. हिट्स व फॉलोअर्स

# आशेला आव्हान अर्थाचे!

भारताची अर्थव्यवस्था लवकरच जगात सर्वाधिक वेगाने वाढू लागेल, हे अर्थ मंत्रालयाच्या अहवालातील विधान निश्चितच सुखकारक. करोनाकाळ सुरू व्हायच्या आधीपासून लटपटणारे आपले अर्थकारण हे असे पुन्हा जोमाने धावू लागणार असेल तर त्याचा प्रत्येक भारतीयास आनंदच होईल. याचे कारण याच वास्तवाच्या प्रतीक्षेत तर सारा देश २०१४ पासून आहे. तेव्हा दिवाळी सरता सरता अर्थ मंत्रालयाच्या अहवालातील ताजा आशावाद दिवाळीचा आनंद दीपोत्सवानंतरही देतो. या मंत्रालयाच्या अहवालानुसार आगामी काळात नागरिकांकडील मागणीत वाढ होईल आणि त्याचा अर्थगतीस हातभार लागेल. गेले जवळपास दोन वर्षे मागणी आणि पुरवठा यांत विसंवाद होता. म्हणजे नागरिकांकडून मागणी नसतानाही सरकार पुरवठा वाढवण्यात मग्न होते. हा पुरवठा प्रामुख्याने पैशाचा होता. अधिक पतपुरवठा केला की अधिक कर्जे घेतली जातील आणि अधिक मागणी वाढेल असा सरकारचा हिशेब. त्याचा जमाखर्च काही लागत नव्हता. नंतर करोनाची लाट मंदावली, लसीकरण वाढले आणि अर्थव्यवस्था स्थिरावू लागल्याचे चित्र निर्माण झाले. इतके दिवस खर्चास हात आखडता घेणारा नोकरदार वर्ग तिसऱ्या लाटेची भीती कमी झाल्याने खर्च करू लागला. वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) वाढत्या मासिक संकलनातही याचे प्रतिबिंब पडताना दिसते. गेले साधारण तीन-चार महिने वस्तू/सेवा कराची मासिक वसुली लक्षणीय असून गेल्या महिन्यात तर या करउत्पन्नाच्या दुसऱ्या क्रमांकाच्या वसुलीची नोंद झाली. हे मागणी वाढू लागल्याचे लक्षण. तेव्हा दिवाळीत सेवासुरक्षित नोकरदारांच्या खरेदीस उधाण आले यात नवल नाही. विशेषत: शहराशहरांत महादुकानांचा झगमगाट आणि खरेदीस आसुसलेले नागरिक असे चित्र सर्रास दिसत होते. विशेषत: गेल्या दिवाळीतील उपासमारीच्या पार्श्वभूमीवर ही दिवाळी तुलनेने करोनामुक्त असल्याने हा उत्साह दुथडी भरभरून वाहत होता. ही सारी अर्थव्यवस्थेचे ग्रहण सुटणार अशी चिन्हे. तेव्हा अर्थ मंत्रालयाचा अहवाल या सर्व घटकांची नोंद घेत आगामी अर्थचित्रात अधिक जोमाने गुलाबी रंग भरत असेल तर ते साहजिक म्हणायचे. अर्थप्रगतीची ही आनंदीवार्ता गुरुवारी जवळपास सर्व माध्यमांनी ठसठशीतपणे प्रसिद्ध



केली. माध्यमे जेव्हा सकारात्मक अर्थवृत्त देतात तेव्हा सर्वसाधारण अनुभव असा की भांडवली बाजार अधिक जोमाने उसळतो. भावनेवर चालणाऱ्या या बाजारात आनंददायी भावना नेहमीच निर्देशांक वाढवणारी ठरते. पण गुरुवारी मात्र तसे झाले नाही. एका बाजूला अर्थ मंत्रालय अर्थगतीचे अत्यंत आश्वासक चित्र सादर करत असताना भांडवली बाजाराने मान टाकणे आश्चर्यकारक होते. भांडवली बाजाराचा निर्देशांक जवळपास ४५० अंकांनी घसरला. अर्थव्यवस्था आणि भांडवली बाजार यांचा अर्थाअर्थी काहीही संबंध नसतो हे सत्य असले तरी सकारात्मक वृत्त या भावनिक भांडवली खेळात निर्देशांकास मोठा झोका देते हेही वास्तव. पण आज मात्र तसे झाले नाही. काय कारण असावे यामागचे? या प्रश्नाचा शोध घ्यायचा याचे कारण या बाजारातील 'खेळाडूं'ना वास्तवाचे अधिक भान असते. त्यामुळे आर्थिक प्रगतीची सुवार्ता बाजारास प्रफुल्ल करीत नसेल तर त्यामागील कारणमीमांसा आवश्यक.

त्यामागे प्रामुख्याने दोन कारणे. पहिले वाहन उद्योग क्षेत्राचे. एकीकडे महादुकाने आदी ग्राहकांनी ओसंडून वाहत असताना चारचाकी तसेच दुचाकींची मागणी कमी होत असेल तर ही बाब लक्षवेधी. गतसाली नवरात्र-विजयादशमी-दिवाळी या उत्सवी त्रिकोणाच्या महिन्यात देशभरात ४ लाख ५५ हजार मोटारी विकल्या गेल्या. यंदा ही संख्या फक्त ३.०५ लाख इतकीच आहे. कोणत्याही अर्थव्यवस्थेसाठी वाहन क्षेत्र मध्यवर्ती असते. पोलाद, रबर, उच्च दर्जाचे प्लास्टिक, ॲल्युमिनियम, काच ते इंधन असे एक भले मोठे अर्थचक्र वाहन उद्योगामुळे फिरते. त्यामुळे या क्षेत्रास मंदीसदृश आजाराने ग्रासले तर हे चक्र थांबते वा त्याची गती मंदावते. या क्षेत्रातील अभ्यासकांनुसार यंदा वाहन उद्योगाच्या मागणीतील घट ही साधारण २० टक्क्यांहून अधिक आहे. हे झाले चारचाकी वाहनांबद्दल. पण दुचाकी तसेच कमी क्षमतेच्या दुचाकींबाबतही काही बरे चित्र नाही. गतसाली मोटरसायकली/स्कूटर्स यांची या काळातील विक्री ११,५६,३३३ इतकी झाली. यंदा मात्र हे प्रमाण १०,२६,८५२ इतके कमी झाले. ही घट ११.२० टक्के इतकी आहे. मोपेडादी कमी क्षमतेच्या दुचाक्या यंदा ३० हजारांच्या आसपास विकल्या गेल्या. गतवर्षी ही विक्री ३५ हजारांहून अधिक होती. अर्थविषयक नियतकालिकांत ही दिवाळी वाहन उद्योगांसाठी दशकातील सर्वात वाईट ठरल्याचे मत नोंदवण्यात आले आहे. यावरून या क्षेत्राचा किती हिरमोड झाला असावा याचा अंदाज येतो. हे केवळ प्रवासी वा चैनीच्या वाहनांबाबतच झाले असे नाही. कृषी क्षेत्रासाठी आवश्यक ट्रॅक्टर वगैरे वाहनांच्या विक्रीचे प्रमाणही यंदा घटलेले आहे. गतवर्षी या काळात ४३ हजारांहून अधिक ट्रॅक्टर विकले गेलेले असताना यंदा मात्र ही संख्या ३८ हजारांपेक्षाही कमी आहे. त्याच वेळी रिक्षा वा तीनचाकी वाहने मात्र मोठय़ा जोमाने विकली गेल्याचे दिसते. या काळात रोजगार गमावण्याची वेळ आलेल्या अनेकांनी रिक्षा वा मालवाहतुकीचा स्वरोजगारीचा मार्ग निवडला असे कानावर येतच होते. त्याची प्रचीती या आकडेवारीवरून येते. गतसाली रिक्षा वा तीनचाकी वाहनांची विक्री जेमतेम १५ हजारांच्या आसपास होती. यंदा ती २२ हजारांहून अधिक झाली. या काळात मालवाहतुकीच्या मोठय़ा वाहनांच्या विक्रीतही वाढ झाल्याचे दिसते.

दिवाळीच्या काळात मोठय़ा प्रमाणावर किरकोळ विक्री उत्सव सुरू होतो. त्याच्याशी सुसंगत ही आकडेवारी आहे. दुसरा असा तपशील आहे तो बेरोजगारीच्या आकडेवारीचा. 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी' (सीएमआयई) या संस्थेच्या ताज्या अहवालानुसार दीपोत्सवाच्या या प्रकाशमान काळात अनेकांच्या आयुष्यात बेरोजगारीचा काळोख दाटला. वास्तविक गेले काही महिने बेरोजगारीचे प्रमाण कमी होईल अशी अपेक्षा सर्वच थरांतून व्यक्त होत होती. पण वास्तव मात्र त्याच्या उलट आहे. ती फक्त अपेक्षाच होती. म्हणजे या सणासुदीच्या काळात बेरोजगारांच्या संख्येत तब्बल ५५ लाखांनी भर पडली. यात धक्कादायक बाब अशी की ही संख्या सप्टेंबरच्या संख्येपेक्षा अधिक आहे. सप्टेंबर महिन्यात देशात एकूण बेरोजगारी ६.९ टक्के इतकी होती. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस ती ७.८ टक्के अशी झाली. या संदर्भात लक्षात घ्यायला हवे की दिवाळीचा सण जरी प्रत्यक्ष नोव्हेंबरात होता तरी त्याबाबतच्या व्यापारउदिमाची तयारी ही आधी महिनाभर तरी सुरू असते. अनेक उद्योगांत हंगामी कामगार नेमले जातात, कंत्राटी कामगारांची भरती होते. म्हणून या काळात आधीच्या महिन्यापेक्षा रोजगार अधिक होतात. पण यंदा मात्र चित्र उलट दिसते. सप्टेंबरात रोजगारात ८५ लाखांची भर पडून एकूण रोजगार क्षेत्र ४० कोटी ६२ इतके झाले. पण ऑक्टोबरात मात्र रोजगारितांची संख्या ४० कोटी आठ लाखांवर आली. यातही चिंता करावी अशी बाब म्हणजे या काळात शहरी भागात रोजगारात किंचितशी वाढ होत असताना भरवशाच्या कृषिकेंद्री ग्रामीण भागांत मात्र ते आटले. समस्त ग्रामीण भागात यामुळे बेरोजगारांचे प्रमाण ७.९१ टक्के इतके आहे. म्हणजे दर शेकडय़ांतील साधारण आठांच्या हातास काम नाही. म्हणजे हे करोना साथीसारखे म्हणायचे. साथ नियंत्रणात असली तरी परिस्थिती कधी बदलेल हे सांगता येत नाही, असे सरकारच म्हणते. त्याप्रमाणे अर्थव्यवस्था सुरळीत होत असल्याचे दिसत असले तरी ती रुळांवरूनच धावत राहील याची शाश्वती नाही. विद्यमान चित्र आशादायक हे खरेच. पण आशेसमोर असलेले अर्थाचे आव्हान लक्षात घेऊन आपण किती सावध पावले टाकतो त्यावर पुढील प्रगती अवलंबून असेल.

# मुंबई क्रूझ ड्रग्स प्रकरण: सुनील पाटील, के पी गोसावीचाच सर्व प्लॅन, मला चुकीच्या पद्धतीने अडकवलं, सॅम डिसुझाचा आरोप!

मुंबई: आर्यन खानवर 2 ऑक्टोबर रोजी क्रूझ ड्रग्स प्रकरणी एनसीबीने कारवाई केली. या प्रकरणी आर्यन खान निर्दोष आहे, हे सिद्ध करण्यासाठी शाहरूख खानची मॅनेजर पूजा ददलानी आणि के पी गोसावी तसेच सुनील पाटील यांनीच प्लॅन आखल्याचा आरोप सॅम डिसूजा याने केला आहे. 'सुनील पाटील आणि के पी गोसावी यांनीच मला चुकीच्या पद्धतीने अडकवलं आहे', असा आरोप सॅम डिसुझा याने केला. एनसीबीकडून समन्स पाठवल्यानंतर सॅम डिसूजा आज चौकशीसाठी हजर झाला होता. मुंबई क्रूज ड्रग्स प्रकरणी आणि आर्यन खानला या केसमधून वाचवण्यासाठी शाहरूख खानच्या मॅनेजरकडून 25 कोटी रुपयांची डील झाल्याच्या प्रकरणात आज सॅम डिसूजाची चौकशी झाली. एनसीबीच्या टीमने सॅमचा जबाब नोंदवला. 'सुनील पाटील आणि किरण गोसावीच मास्टरमाइंड' एनसीबीचत्या चौकशीनंतर, tv9 च्या प्रतिनिधींशी बोलताना सॅम डिसूजा म्हणाला, 'आर्यन खानला वाचवण्यासाठी डीलचा सगळा प्लॅन सुनील पाटील आणि किरण गोसावीने



मिळून केला होता. मी या डीलमध्ये सहभागी नव्हतो. डील फिक्स झाल्यानंतर किरण गोसावीचे बॉडीगार्ड प्रभाकर साईलने शाहरूख खानची मॅनेजर पूजा ददलानीकडून 50 लाख रुपये टोकन मनीच्या रुपात घेतले. अशी एखादी डील होत आहे, याची मला माहितीसुद्धा नव्हती. हे सगळ्या घडल्यानंतर मला माहिती मिळाली. मी डीलमध्ये सहभागी असतो, तर माझ्या खात्यात काहीतरी पैसे आले असते ना?'

'किरण गोसावी आणि शाहरूखची मॅनेजर पूजा ददलानी यांची मीटिंग' सॅम डिसूजाने चौकशीत सांगितले की, "किरण गोसावीला मी यापूर्वी ओळखत नव्हतो. सुनील पाटीलकडून मला गोसावीचा नंबर मिळाला तेव्हा मी गोसावीचा नंबर एनसीबीला पाठवला." म्हणजेच सॅम डिसूझानेच एनसीबीच्या अधिकाऱ्यांना किरण गोसावीची ओळख करून दिली, तसेच दुसरीकडे शाहरूख खानची मॅनेजर पूजा ददलानीचीही ओळख करून दिली , अशी कबूली सॅम डिसूजाने यावेळी दिली. मात्र अशा प्रकारची डील होत असल्याची आपल्याला कल्पना नव्हती, या मुद्द्यावर सॅम डिसूजा ठाम राहिला.

### 'समीर वानखेडेंनाही मी एकदाच भेटलो'

एनसीबीचे अधिकारी समीर वानखेडे यांनाही मी आतापर्यंत एकदाच भेटलो आहे, अशी माहिती सॅम डिसूजाने दिली. तसेच व्ही.व्ही. सिंग यांच्याशी माझं जे बोलणं झालं होतं, ते विड बेकरी संदर्भातल्या एका केससाठी मला समन्स होता, त्यावरून बोलणं झालं होतं, असं स्पष्टीकरण सॅम डिसूजाने दिलं आहे.

### सुनील पाटीलचे सॅम डिसूजा व मोहित कंबोजवर आरोप

आर्यन खान ड्रग्ज प्रकरणात किरण गोसावी, मनिष भानुशाली आणि सॅम डिसुजा हेच मास्टरमाइंड असल्याचा दावा सुनिल पाटील यांनी यापूर्वी दिलेल्या एका मुलाखतीत केला होता. तर सुनील पाटील हेच आरोपी असून त्यांचा राष्ट्रवादीशी संबंध असल्याचं खळबळजनक वक्तव्य मोहित कंबोज यांनी केलं होतं.

### कोण आहेत सुनील पाटील?

सुनील पाटील हे धुळ्याचे रहिवासी असून ते माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या अत्यंत जवळचे मानले जातात. राष्ट्रवादी काँग्रेसमधून 2009 ते 2014 मध्ये बबनराव पाचपुते जेव्हा आमदार होऊन कॅबिनेट मंत्री झाले त्यावेळी सुनील पाटील हे त्यांच्या बंगल्यावर नेहमी दिसायचे, असं म्हटलं जातं. सुनीव पाटील यांचे सोशल मीडियावरही काही फोटो आहेत, त्यात ते भाजपचे गुजरातचे मंत्री किरीट सिंह राणा यांच्यासोबत तर दुसऱ्या एका फोटोत मनीष भानुशालीसोबत दिसतात.

# प्रियकराने लग्नाचं आमिष देत छपराहून दिल्लीला बोलावलं, मग मित्रांसोबत अल्पवयीन मुलीवर सामुहिक बलात्कार

छपरा : बिहारमधील छपरा येथे प्रेमप्रकरणातून घरातून पळून गेलेल्या अल्पवयीन मुलीवर दिल्लीत सामूहिक बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मुलीच्या प्रियकराने आधी तिचे अपहरण करुन तिला दिल्लीला नेले आणि तिथे त्याच्या मित्रांनी मिळून तिच्यासोबत सामूहिक बलात्कार केला,

अशी माहिती आहे. त्यानंतर मुलगी कशीबशी छपरा येथे पोहोचली आणि तिने तरैया पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल केली.

तरैया पोलीस स्टेशन हद्दीतील एका इंटर विद्यार्थिनीचे जवळच्याच गावातील राहुल कुमार या तरुणाशी प्रेमसंबंध होते. यानंतर तिचा प्रियकर दिल्लीला गेला. तेथून तो मोबाईलच्या माध्यमातून विद्यार्थिनीसोबत सतत संपर्कात होता.

काही दिवसांपूर्वी विद्यार्थिनीच्या प्रियकराचा मित्र संजीव शर्मा त्याच्या अन्य तीन मित्रांसह चारचाकी वाहनाने तरैय्या खडरा पुलाजवळ आला. त्यावेळी विद्यार्थिनी इंटरची परीक्षा द्यायला जाणार होती.

यादरम्यान, प्रियकराच्या मित्राने



त्याचा हात पकडून जबरदस्ती तिला कारमध्ये बसवले.

तरुणीच्या प्रियकराच्या मित्राने सांगितले की, तुझ्या प्रियकराने तुला दिल्लीला बोलावले आहे. त्यानंतर तिला छपरा येथे नेले आणि तेथून दिल्लीला नेले. विद्यार्थिनीला आठ दिवस दिल्लीतच ठेवले होते जिथे तिच्या प्रियकर आणि मित्रांनी अल्पवयीन मुलीवर सामुहिक बलात्कार केला.

छपराच्या मुलीवर झालेल्या सामूहिक बलात्काराच्या या घटनेचा पोलीस तपास करत आहेत. या प्रकरणी छपराचे एसपी संतोष कुमार यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, पीडितेने याप्रकरणी लेखी अर्ज दिला आहे. चौकशीनंतर कारवाईची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. लवकरच सामूहिक बलात्कारातील सर्व आरोपींना अटक करण्यात येईल, असे एसपी म्हणाले. याप्रकरणी पीडित मुलीने एसपींकडे न्यायाची मागणीही केली आहे.

## बिल्डर नवऱ्याच्या अफेअरचा संशय; बायकोनं असं काय केलं की सगळेच झाले अवाक्...



नवी मुंबई: न्हावा शेवा पोलिसांनी नुकतीच एका तामिळनाडूच्या महिलेला अटक केली आहे. अलगू मीनाक्षी (वय ४०) असे या महिलेचे नाव आहे. पती विजयराजन (वय ४६) असे अपहरण झालेल्या पतीचे नाव असून, ते बांधकाम व्यावसायिक आहेत. सीवूडसमध्ये त्यांचे कार्यालय आहे. महिलेने आपल्या सात साथीदारांच्या मदतीने त्यांचे अपहरण केले होते. कौटुंबिक वादातून हा प्रकार घडल्याची माहिती मिळाली आहे. न्हावा शेवा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या दाम्पत्याचे घटस्फोट प्रकरण तामिळनाडूमध्ये न्यायप्रविष्ट आहे. पतीचे नवी मुंबईत अन्य एका महिलेसोबत अनैतिक संबंध असल्याचा संशय मिनाक्षीला होता. त्यावरून तिने बिल्डर पतीचे अपहरण करण्याचा कट रचला. पोलिसांनी आरोपींविरोधात अपहरण करणे आणि अन्य कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत. २७ ऑक्टोबर रोजी मीनाक्षी आणि तिचे अन्य साथीदार कारने नवी मुंबईत आले. तिने एका महिलेला ग्राहक बनवून पतीच्या कार्यालयात पाठवले. घर बघण्याचा बहाणा करून ती गेली होती. विजयराजन यांनी त्यांना उलवे भागातील खारखोपर येथील दोन प्रोजेक्टच्या ठिकाणी नेले. दरम्यान त्याचवेळी मीनाक्षी आणि तिचे अन्य पाच साथीदार त्यांचा पाठलाग करत होते. प्रोजेक्ट साइटवर त्यांनी विजयराजन यांना कारमध्ये कोंबून त्यांचे अपहरण केले, अशी माहिती पोलिसांनी दिली. विजयराजन हे संपूर्ण दिवस कार्यालयात परतले नाहीत. त्यामुळे त्यांच्या कार्यालयातील इतर कर्मचारी चिंतेत पडले. काहीतरी विपरीत घडलंय अशी शंकेची पाल त्यांच्या मनात चुकचुकली. त्यांनी न्हावा शेवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. त्यांचा मोबाइल फोन ट्रॅक केला. त्यांचा शेवटचा ठावठिकाणा पणजी होता.

## नवऱ्याला धडा शिकवण्यासाठी बायकोनं केलं धक्कादायक कृत्य; स्वत:च्या घरातच...



नवी दिल्ली: पतीसोबत पटत नसल्याने त्याला धडा शिकवण्यासाठी महिलेने धक्कादायक कृत्य केल्याची बाब उघड झाली आहे. महिलेने आपल्या एका नातेवाइकाच्या मदतीने घरातच चोरी केल्याचे तपासात उघड झाले असून, पोलिसांनी महिलेला आणि तिच्या नातेवाइकाला ताब्यात घेतले आहे. सीसीटीव्ही फुटेज आणि कॉल रेकॉर्डमधून या घटनेचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे. नवी दिल्लीच्या द्वारका परिसरात ही घटना घडली होती. आरोपी पत्नीचे तिच्या पतीसोबत पटत नव्हते. त्यामुळे या महिलेने स्वतःच्याच घरात चोरी करण्याचा कट रचला. तिने आपल्या एका नातेवाइकाच्या मदतीने घरात चोरी केली. पोलिसांनी महिला आणि तिच्या नातेवाइकाला ताब्यात घेतल्याची माहिती रविवारी दिली. दिल्लीच्या द्वारका परिसरात गोपाळ नगरमध्ये ११ नोव्हेंबरला दुपारी दोन ते संध्याकाळी सहा वाजताच्या दरम्यान ही घटना घडली होती. रवी हा आपल्या कुटुंबीयासोबत राहतो. घरातून रोकड आणि दागिन्यांची चोरी झाल्याची तक्रार त्याने पोलिसांत दिली होती. बाबा हरिदास नगर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास करून चोरीचा घटनेचा उलगडा केला.

## ज्येष्ठ नागरिकाला ऑनलाइन गंडा



पुणे, बँक खात्याला 'पॅन' क्रमांक जोडण्याच्या बहाण्याने सायबर चोरट्याने कोंढव्यातील ज्येष्ठ व्यक्तीला पाच लाख रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कोंढवा पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ५७ वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. त्यानुसार अज्ञात व्यक्तीच्या विरुद्ध 'आयटी ॲक्ट'सह फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदारांचा जाहिरात एजन्सीचा व्यवसाय आहे. सायबर चोरट्याने त्यांच्या मोबाइलवर एक लिंक पाठवून तुमचे खाते बंद होणार असून, तुम्ही तत्काळ 'पॅन' क्रमांक अपडेट करून घ्या, असा मेसेज पाठविला होता. तक्रारदारांना हा मेसेज बँकेतून आला असावा, असे वाटल्यामुळे त्यांनी त्या लिंकवर क्लिक करून सायबर चोरटा सांगेल त्याप्रमाणे प्रक्रिया केली. काही वेळातच तक्रारदारांच्या बँक खात्याचा ताबा चोरट्याने घेऊन त्यांच्या खात्यातून पाच लाख चार हजार ३४२ रुपये आपल्या खात्यात वळवले. खात्यातून पैसे कमी झाल्याचा मेसेज येताच फसवणूक झाल्याचे तक्रारदारांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी सायबर पोलिसांकडे तक्रार अर्ज दिला.


# इंद्रलोक परिसरातील "मेरा मार्ट" ला बंदी असलेले प्लास्टिक बाळगल्याप्रकरणी ₹5000/- दंड-

## उपायुक्त अजित मुठे यांनी केली कारवाई.









मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इंद्रलोक परिसरात आज प्लास्टिक विक्रेत्यांवर कारवाई करण्यात येवून त्यांच्याकडून १० ते १५ किलो प्लास्टिक कॅरिबॅग, प्लास्टिक ग्लासेस, प्लेट इत्यादी जप्त करण्यात आले.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि,आज सकाळी महापालिकेचे उपायुक्त अजित मुठे,त्याच प्रमाणे स्वच्छता निरीक्षक रवि पाटील व त्यांचे कर्मचारी इंद्रलोक परिसरात असतांना एका टु व्हिलर वाहनावर प्लास्टिक कॅरिबॅग घेवून जाताना पेणकर पाडा येथिल रहिवासी बनसोडे हा आढळला. त्याच्याकडे विचारणा केली असता त्याने सांगितले की,तो विविध छोट्या विक्रेत्यांना प्लास्टिक



पुरवितो.त्याच्याकडील संपूर्ण प्लास्टिक जप्त करण्यात येवून त्याला ₹५०००/- दंड करण्यात आला.तर दुसऱ्या घटनेत उपायुक्त अजित मुठे व त्यांच्या टिमने इंद्रलोक परिसरात असलेल्या "मेरा मार्ट" या मॉलवर कारवाई करुन त्यांच्याकडून प्लास्टिक कॅरिबॅग, प्लास्टिक पेले ताटल्या जप्त केले.संबंधित मॉलच्या मालकाला ₹५०००/- दंड करण्यात येवून त्यांच्याकडून प्लास्टिकचा सर्व माल जप्त करण्यात आला. बंदी असलेले प्लास्टिक विक्री करु नका, अन्यथा अशीच दंडात्मक कारवाई करण्यात येईल असा इशारा उपायुक्त अजित मुठे यांनी विक्रेत्यांना दिला आहे.बऱ्याच वेळा रस्त्यावरील भाजी विक्रेत्यांकडे प्लास्टिक कॅरिबॅग असतात.मात्र त्यांच्यावर मुकादम व स्वच्छता निरीक्षक यांच्या कडून कोणतीही कारवाई केली जात नसल्याचे दिसून येते. यापुढे अशी कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यावरच महापालिकेकडून कारवाई करण्यात येणार आहे.त्याचप्रमाणे ज्या स्वच्छता निरीक्षक व मुकादमाच्या कार्यक्षेत्रात प्लास्टिक आढळेल त्यांच्यावरही उचित कारवाई करण्यात येणार आहे असे उपायुक्त अजित मुठे यांनी सांगितले.

## कोरोनाचा पॅरोल पथ्यावर? राज्यातल्या 20 हजार कैद्यांची कायमची सुटका? काय आहे, सर्वोच्च न्यायालयातला खटला?



औरंगाबाद: देशात तसेच राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्यानंतर देशभरातील तुरुंगातील विशिष्ट गुन्ह्यातील आरोपींना पॅरोल मंजूर करण्यात आला होता. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे 20 हजार कैदी पॅरोलवर सुटले होते. मात्र पॅरोलचा कालावधी त्यांच्या मूळ शिक्षेच्या कालावधीत गृहित धरावा का, या बाबत सर्वोच्च न्यायालयात खटला सुरु आहे. न्यायालयाने हा धोरणात्मक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य राज्याला दिले आहे. पुढील 4 आठवड्यात यासंदर्भात सुनावणी होईल.

### मुंबईतील कैद्याच्या याचिकेसंबंधी खटला

मुंबईतील मुबीन खान याना भादंवि कलम 498 आणि कलम 302 अन्वये अटक झाली. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने त्याला 11 वर्षे, 8 महिने आणि 5 दिवसांची शिक्षा सुनावली होती. कोरोना संसर्गामुळे 15 मे 2020 रोजी त्याला अत्यावश्यक बाब म्हणून कोरोना पॅरोल रजा मंजूर करण्यात आली. या काळात मुबीनच्या एकूण शिक्षेचा कालावधी संपला. औरंगाबाद खंडपीठाने त्याला 498 अ अंतर्गत दोषमुक्त केले. तर 302 अंतर्गत शिक्षा कायम ठेवली. ही शिक्षा कायम करताना राज्याने त्याच्या शिक्षेच्या एकूण कालावधीची गणना करताना पॅरोलचा कालावधी मोजला नाही. त्यामुळे त्याची सुटका झाली नाही. या निर्णयास त्याने ॲड. रमेश जाधव व अन्य वकिलांमार्फत सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले.

### ... 20 हजार कैद्यांची सुटका होणार

सरकारी वकिलाने सर्वोच्च न्यायालयात केलेल्या युक्तिवादानुसार, जन्मठेप झालेल्या कैद्याची 14 वर्षे शिक्षा पूर्ण झाल्यावर प्रिझनर्स ॲक्टनुसार, त्यांची मुदतपूर्व सुटका करण्याचा निर्णय शासन घेऊ शकते. यावर सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, या प्रकरणात याचिकाकर्त्याला 15 मे 2020 रोजी पॅरोल मंजूर झाला नसता, तर त्याच्या 14 वर्षांच्या मूळ शिक्षेचा कालावधी पूर्ण झाला असता.

## टुरिस्ट व्हिसावर भारतात आल्या विदेशी तरूणी; सेक्स रॅकेट चालवायच्या, असा झाला भंडाफोड

नवी दिल्ली: टुरिस्ट व्हिसावर भारतात आलेल्या उजबेकिस्तानच्या दोन तरूणी सेक्स रॅकेट चालवत होत्या. दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने या तरुणींसह एका कॅब ड्रायव्हरला अटक केली आहे. या तरूणी एका रात्रीसाठी २०-२० हजार रुपये घ्यायच्या अशी माहिती उघड झाली आहे. तर कॅब ड्रायव्हरला दोन हजार रुपये कमिशन म्हणून मिळायचे.

उजबेकिस्तान येथून भारतात आलेल्या अनुक्रमे २४ वर्षीय आणि २८ वर्षीय तरुणी महिपालपूरमध्ये राहत होत्या. या दोघी तरूणी सेक्स रॅकेट चालवत होत्या. या दोघींना दिल्लीच्या गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्यांच्यासोबत कॅब ड्रायव्हर पुरन सिंह यालाही अटक केली आहे. पोलिसांनी सांगितले की, काही विदेशी तरूणी सेक्स रॅकेट चालवत असल्याची माहिती मिळाली होती. याचा तपास केला असता, मोनू नावाचा एजंट विदेशी तरूणींना देहव्यापारासाठी घेऊन येत असल्याची ठोस माहिती हाती लागली.

### सापळा रचून केली अटक



मोनू या एजंटकडे तीन-चार विदेशी तरुणी पुरवण्यासाठी संपर्क साधण्यात आला होता. त्यावेळी एक तरूणी एका रात्रीसाठी २० ते २५ हजार रुपये घेत असल्याचे एजंटने सांगितले होते. अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिटने एक पथक तयार केले. ठरल्यानुसार, रोहिणीच्या सेक्टर १५ मध्ये एका कॅबमध्ये दोन तरूणी तिथे आल्या होत्या. त्या दोघीही उजबेकिस्तानच्या असल्याची माहिती मिळाली. दोघींनी २०-२० हजार रुपयांची मागणी केली. पोलिसांनी या दोघी तरुणींना पकडले.

कॅब ड्रायव्हरने कमिशन स्वरुपात प्रत्येकी दोन हजार रुपये घेतले होते. पोलिसांनी त्यालाही अटक केली. गुन्हा नोंदवल्यानंतर तिघांनाही अटक करण्यात आली आहे. चौकशी केली असता, दोन्ही तरूणी या भारतात टुरिस्ट व्हिसावर आल्या होत्या. या ठिकाणी त्या मुदत उलटून गेली तरी, राहत होत्या. आपल्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी त्यांनी पैसे कमावण्याचे साधन म्हणून देहव्यापार करण्यास सुरुवात केली होती. चार पाच महिन्यांपासून तरुणी पुरवणाऱ्या रमेशच्या संपर्कात होतो. तो ग्राहकांपर्यंत तरुणींना सोडण्यासाठी जात होता, अशी माहिती कॅब ड्रायव्हर पुरनने पोलिसांना दिली. पोलीस आता या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश करणार आहेत. त्या दिशेने पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# मुंबई एनसीबीची मोठी कारवाई, जळगावातून 1500 किलो गांजा जप्त

मुंबई : राज्यात सध्या ड्रग्ज विरोधात मोठ्या प्रमाणात कारवाया केल्या जात आहेत. यादरम्यान आता मुंबई एनसीबीच्या पथकाने जळगावात एक मोठी कारवाई करत तब्बल 1500 किलो गांजा जप्त केला आहे. एनसीबीच्या पथाकाने यावेळी दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं असून पुढील कारवाई सुरु आहे. एएनआय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रतील जळगाव जिल्ह्यातील एरंडोलजवळ एनसीबीच्या पथकाने तब्बल 1500 किलो गांजा जप्त केला आहे. याप्रकरणी एनसीबीने दोन जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. हा गांजा आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथून आणला जात होता. महाराष्ट्रासह मुंबईत सध्या मोठ्या प्रमाणात एनसीबीकडून कारवाया केल्या



जात आहेत. यादरम्यान, एनसीबीने अनेक ड्रग्ज पॅडलर्सच्या मुसक्या आवळल्या आहेत. तर, बॉलिवूडशी संबंधित अनेकांवरही एनसीबीकडून कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे सध्या राज्यातील ड्रग्ज पॅडलर्समध्ये धाकधूक वाढली आहे.

### औरंगाबादेत माजी नगरसेवकाच्या भावाच्या गाडीत नशेच्या 260 गोळ्या

काहीच दिवसांपूर्वी औरंगाबाद शहरातील माजी नगरसेवक सय्यद मतीन (Sayyad Matin) यांच्या भावाची गाडी घेऊन जाणाऱ्या एका इसमाकडे नशेच्या 260 गोळ्या (बटण) आढळून आल्या होत्या. गुरुवारी (11 नोव्हेंबर) शहरातील सिटी चौक पोलिसांनी अण्णा भाऊ साठे चौकात रात्री साठेआठ वाजता ही कारवाई केली. या प्रकरणी पोलिसांनी सय्यज मंजूर या आरोपीला अटक केली आहे.

### खबरींनी दिलेल्या माहितीवरून कारवाई

आरोपी कारमधून नशेच्या गोळया घेून जात असल्याची माहिती पोलीस निरीक्षक अशोक गिरी यांना गुरुवारी मिळाली होती. त्यांच्या सूचनेनुसार उपनिरीक्षक रोहित गांगुर्डे, अंमलदार देशराज मोरे यांच्या पथकाने अण्णा भाऊ साठे चौकात सापळा रचून गाडी अडवली. सय्यद मंजूरची तपासणी केली असता 13 स्ट्रीपमध्ये 260 गोळ्या आढळून आल्या.

## ट्रेनच्या डब्यात आढळला होता 19 वर्षीय तरुणीचा मृतदेह; डायरीमधील मजकुरावरुन पोलिसांना संशय



वडोदरा: गुजरातमधील वलसाडमध्ये काही दिवसांपूर्वी एका १९ वर्षीय तरुणीचा मृतदेह ट्रेनमधील डब्यात लटकलेल्या अवस्थेत सापडला होता. या तरूणीवर सामूहिक अत्याचार झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. घटनेचा तपास सुरू असतानाच, तरुणीने डायरीत लिहिलेल्या मजकुरावरून पोलिसांनी हा संशय व्यक्त केला आहे. वडोदरा पोलिसांच्या माहितीनुसार, या महिन्याच्या सुरुवातीला गुजरातच्या वलसाडमध्ये एका १९ वर्षीय तरुणीचा मृतदेह एक्स्प्रेसच्या डब्यात लटकलेल्या अवस्थेत सापडला होता. त्या तरुणीवर सामूहिक बलात्कार झाल्याचा संशय आहे. ती तरूणी वसतिगृहात जात असताना ही घटना घडली. गुजरातमधील नवसारीमध्ये राहणाऱ्या आणि वडोदरा येथे महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीचा मृतदेह वलसाडमध्ये एक्स्प्रेसच्या एका डब्यात लटकलेल्या अवस्थेत सापडला होता. त्यानंतर या घटनेची रेल्वे पोलिसांनी नोंद केली होती. ही तरूणी वडोदरा येथे एका वसतिगृहात राहत होती. पोलिसांनी सांगितले की, तरुणीने एका डायरीत मजकूर लिहिला होता. त्या आधारे या तरूणीवर सामूहिक अत्याचार झाल्याचा संशय आहे. वडोदरामध्ये एका रिक्षातून दोन आरोपींनी तिचे अपहरण केले होते, तिच्या डोळ्यांवर पट्टी बांधली होती. एका निर्जन ठिकाणी घेऊन गेल्याचा उल्लेख या डायरीत करण्यात आला होता. पोलीस महानिरीक्षक सुभाष त्रिवेदी यांनी सांगितले की, राज्य सरकारने या घटनेची गांभीर्याने दखल घेतली आहे.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्क:-9594418181 / 8424989898